# वीज पडल्यास काय कराल ?

## घरामध्ये घ्यावयाची काळजी

(१) दरवर्षी पावसाळयामुळे अंगावर वीज पडल्यामुळे अनेक प्रमाणावर लोक मरण पावतात, अथवा दुर्घटनाग्रस्त होतात.
(२) वीज व वादळापुर्वी संगणक, टेलिव्हिजन इ.विद्युत उपकरणे बंद करुन स्त्रोतापासून अलग करुन ठेवावीत.
(३) शक्यतो दुरध्वनीचा वापर टाळावा.
(४) न्हाणीघरात/बाथरुममध्ये वादळी वातावरणात शॉवर, वीजेच्या उपकरणांचा उपयोग टाळा.
(५) जर तुम्ही घरामध्ये असाल तर दारे व खिडक्या बंद करुन सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या.
(६) पाण्याचे नळ, टेलीफोन, फ्रिज यांना स्पर्श करु नका, विजवाहक वस्तु जसे लोखंडी पाईप, स्टोव्ह, व विजेवर चालणा-या यंत्रापासुन दुर रहा.

## घराबाहेर घ्यावयाची काळजी

(१) आकाशात वीज चमकल्यानंतर दहा सेकंदांनी मेघ गर्जनांचा आवाज आल्यास, तिथल्या अंदाजे तीन कि.मी. परिसरात वीज पडण्याची शक्यता समजावी.
(२) झाडाखाली आश्रय घेऊ नये. विजेच्या खांबाजवळ उभे राहु नका. झाडाच्या उंची पेक्षा झाडापासुन दुप्पट अंतरावर उभे राहावे.
(३) आपले वाहन वीजेचे खांब व झाडे यापासून दूर ठेवून सावकाश चालवावे.
(४) मोबाईलचा, दुरध्वनीचा वापर करु नये.
(५) सायकल अथवा दुचाकी वाहनाचा वापर टाळावा.
(६) आपण एखादया मोकळया परिसरात असल्यास, गुडघ्यामध्ये डोके घालून खाली वाकून बसावे.
(७) धातूच्या वस्तू दूर ठेवाव्यात.
(८) शेतात काम करीत असाल व सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतला नसेल तर शक्यतो जिथे आहात तिथेच रहा. शक्य असेल तर पायाखाली लाकुड, प्लास्टिक, गोणपाट अशा वस्तु अथवा कोरडा पालापाचोळा ठेवा.

## प्राथमिक उपचार

(१) वीज पडल्यास मुख्यत: मानवी हदय व श्वसन प्रक्रियेत अडथळा येतो. विद्युतघात झाल्यास लगेच हदयाजवळील भागाच्या परिसराला मालीश करावे. तोंडाने श्वसन प्रक्रीयेस मदत करावी.


**आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम**
**आपत्ती व्यवस्थापन कक्ष**
**जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपुर**
**नियंत्रण कक्ष**
**संपर्क क्रमांक ०७१७२-२५१५९७**
**टोल फ्री क्रमांक १०७७**